स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओजेल-१०८२/पंक१-स्वाते,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १६ फेब्रुवारी, १९८२.

पहा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक :पीओजेल-१०७६-एल, दि. १९ नोव्हेंबर, १९६५.

२) शासनाचे शुद्धिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक :पीओजेल-१०६८-एल, दि. २९ एप्रिल, १९६७.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक :पीओजेल-१२७५/१०३५८/२८४७/एल. सी. दोन-
एफएफएस, दि. ३ जुलै, १९७५.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक :एफएफटी-१०८१/स्वाती-तीन-एफएफएस,
दि. ७ ऑगस्ट, १९८१.

शासन निर्णय :- प्रास्ताविकेत उल्लेख केलेले शासन निर्णय व शुद्धिपत्रक यांच्याद्वारे दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने शासन निदेश देत आहे की,

(एक) महाराष्ट्र राज्यातील ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्यलढ्याच्या कालावधी- दरम्यान किमान एक महिन्याचा कारावास भोगलेला आहे किंवा ज्यांना त्याच कालावधी- साठी तडीपारीची किंवा नजरकैदेची शिक्षा झालेली होती असे स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या विधवा पत्नी किंवा विधुर पती यांना राज्यशासनाचे दरमहा रुपये १५०/- इतके निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र समजण्यात यावे. तथापि, भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांच्या बाबतीत ४ महिनेपर्यंत भूमिगत राहून भाग घेण्यासंबंधी असलेली शर्त कायम राहील.

(दोन) ज्यांनी कारावासाची शिक्षा भोगलेली आहे व जे भूमिगत कार्यकर्ते होते या दोन्ही प्रवर्गांच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या बाबतीत असलेली उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात यावी.

. २...

(तीन) निवृत्तीवेतन मिळण्यासंबंधीच्या केंद्र शासनाच्या योजनेखाली ज्या स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्तीवेतन मिळत होते किंवा मिळत आहे अशा सर्व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या विधवांना केंद्र शासन योजनेखालील निवृत्ती वेतना व्यतिरिक्त राज्यशासनाच्या योजनेखालील स्वातंत्र्य सैनिकांना अनुज्ञेय असलेल्या निवृत्तीवेतनाच्या २५ टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून देण्यात यावी.

२. हे आदेश १ फेब्रुवारी १९८२ पासून अंमलात येतील.

३. यावरील खर्च "२८८–सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम [सी] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना निवृत्तीवेतन" या अर्थसंकल्प शीर्षाखाली मागणी क्र. १३च्या खर्च खाती टाकण्यात यावा व त्याखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४५०/इएक्सपी–४/८२, दि. १२.२.८२ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/–
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. अध्यक्ष, उच्चाधिकार समिती,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,
१२. अधिदान व लेखा अधिकारी,
१३. वित्त विभाग, इएक्सपी–४,
१४. मंत्रालयाचे सर्व विभाग,
१५. माहिती व जनसंपर्क अधिकारी, [प्रसिद्धीपत्रक काढण्यासाठी].